मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

✲ सातारा ✲ ✲ दि. २५ मे २०२४

RNI Regd No.72105/99 ✲ वर्ष २५ ✲ अंक २५४ ✲ सातारा ✲ सोमवार ✲ दि. २७ मे २०२४ ✲ पाने ८ ✲ किंमत ५ रू/

## तर ओबीसी समाज रस्त्यावर उतरेल; शेंडगेंचा इशारा

**मुंबई :** राठा आंदोलक मनोज जरांगे पाटलांनी परत आता चार तारखेला आंदोलनाचा इशारा दिला आहे. मात्र, मनोज जरांगेंच्या आंदोलनाच्या दडपशाहीला बळी पडून सरकारने सगेसोयरेंबाबतचा निर्णय घेतला तर, ओबीसी समाज रस्त्यावर उतरेल, असा इशारा ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी दिला आहे. सगेसोयरेंच्या निर्णयाचा परिणाम ओबीसी आरक्षणावर होणार आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये या आंदोलनाच्या धडपशाहीला त्याठिकाणी बळी पडून जर सरकारने असं काही निर्णय घ्यायचा प्रयत्न केला, तर ओबीसी समाज पुन्हा रस्त्यावर उतरेल, असंही प्रकाश शेंडगे यांनी म्हटलं आहे.

प्रकाश शेंडगे म्हणाले, पार्टी हा आमचा पक्ष लोकसभा निवडणुकीत नवीन असताना देखील आम्ही १६ उमेदवार उभे केले आहेत. १३ उमेदवार आमच्या पक्षाच्या चिन्हावर लढलेत. या निवडणुकीच्या माध्यमातून आम्ही मैदानामध्ये आहोत. ओबीसी बहुजन पार्टी निवडणुकीत उतरली आहे. ही निवडणूक कमी वेळामध्ये साधनं आणि आर्थिक मदत नसताना आम्ही एवढा मोठा प्रमाणात ही निवडणूक लढलो.

प्रकाश शेंडगे म्हणाले, ओबीसींच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत तर जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये शासनाच्या विरोधात आंदोलन करून या ठिकाणी प्रचंड मोठा उद्रेक होईल. त्यातून जे काय परिणाम होतील सर्व जबाबदारी महाराष्ट्र सरकारवर असेल. कुणबी आणि मराठा हे एकच आहे, असा विषय आलेला आहे. पुढे पण हा विषय सुप्रीम कोर्टाने आणि हायकोर्टाने निकालात लावलेला आहे. खत्री कमिशनने कुणबींमध्ये मराठा येत नाही, अशा अहवालात त्या मेन्शन केला आहेत. येत्या मंगळवारी आमचे शिष्टमंडळ पुन्हा एकदा मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना आणि भुजबळ यांना भेटणार आहे. आता नवीन विषय चालू आहे ते ताबडतोड थांबवण्यासाठी आम्ही विनंती करणार आहेत.

### कार्यकारिणीची बैठक

जय आणि पराजयाची आम्हाला चिंता नाही. किंवा त्याचा पर्वाही नाही. येणारी विधानसभा निवडणूक मात्र पूर्ण ताकतीने लढणार आहोत. उद्या आमची कार्यकारिणीची बैठक आहे, त्यामध्ये येणाऱ्या विधानसभा निवडणुकीला कशा पद्धतीने समोर जायचं, याची रणनीती ठरणार आहे, असेही शेंडगे यांनी स्पष्ट केले.

## इंडिया आघाडी तीन कट रचतेय

### घोसीत PM नरेंद्र मोदींचा हल्लाबोल



**घोसी :** देशातील लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी राजकीय पक्षांकडून जोरदार प्रचार सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही उत्तर प्रदेशातील घोसी येथे सभेला संबोधित केले. यावेळी नरेंद्र मोदींनी इंडिया आघाडीवर जोरदार हल्लाबोल केला. पूर्वांचल गेल्या १० वर्षांपासून देशाच्या पंतप्रधानांची निवड करत आहे आणि पूर्वांचल गेल्या ७ वर्षांपासून यूपीचे मुख्यमंत्री निवडत आहे, त्यामुळे पूर्वांचल हे सर्वात खास असल्याचे नरेंद्र मोदींनी सांगितले.

घोसी, बलिया आणि सलेमपूरमधील लोक फक्त खासदार निवडत नाहीत, तर ते पंतप्रधान निवडतात, असे नरेंद्र मोदी म्हणाले. तसेच, समाजवादी पार्टीवरही नरेंद्र मोदींनी निशाणा साधला. समाजवादी पार्टीने नेहमीच षड यंत्राखाली मागासलेला राहिला, मात्र आता माफियांसाठी अश्रू ढाळणाऱ्यांना पाय ठेवू देणार नाही, असे नरेंद्र मोदी म्हणाले. सर्व जातींनी आपापसात लढावे अशी इंडिया आघाडीची इच्छा आहे. राजपूत, ब्राह्मण, राजभर, दलित, कायस्थ या सर्वांनी आपापसात लढून कमकुवत व्हावे. तुम्हाला प्रश्न पडला असेल की इंडिया आघाडीचा फायदा काय होईल? तर जेव्हा समाजातील लोक एकत्र नसतील तेव्हा तुमचे लक्ष खऱ्या मुद्द्यांवरून विचलित होईल, असे नरेंद्र मोदींनी सांगितले.विरोधकांच्या इंडिया आघाडीवर निशाणा साधत नरेंद्र मोदी म्हणाले की, हे लोक त्यांचे मूळ तीन कट पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवत आहेत. एक म्हणजे संविधान बदलून भारतात धर्माच्या आधारावर आरक्षण असेल असे लिहिले जाईल. दुसरे म्हणजे, एससी, एसटी आणि ओबीसीचे आरक्षण रद्द करण्याचे आणि तिसरे म्हणजे मुस्लिमांना धर्माच्या आधारावर संपूर्ण आरक्षण देण्याची योजना आहे.

### इंडिया आघाडीचे लोक राम मंदिरात त्रुटी शोधायला लागले : नरेंद्र मोदी

**निवडणुकीच्या काळात इंडिया आघाडीचे लोक मंदिरांना भेटी देण्याचे नाटक करतात, पण ५०० वर्षांनंतर, जेव्हा आपल्या आस्थेचा इतका मोठा क्षण आला तेव्हा त्यांनी राम मंदिराला शिव्या द्यायला सुरुवात केली आणि त्यात त्रुटी शोधायला लागले. राम मंदिराच्या उभारणीमुळे हे लोक प्रचंड नाराज झाले होते. ज्याप्रमाणे शाहबानोचा निर्णय रद्द करण्यात आला, त्याचप्रमाणे राम मंदिराबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयही रद्द करण्यात यावा, असा दबाव हे लोक सातत्याने आणत आहेत, असेही नरेंद्र मोदी म्हणाले.**

## लष्करप्रमुख मनोज पांडे यांना एक महिन्याची मुदतवाढ!



**नवी दिल्ली :** भारतीय लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांना सेवेत एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. जनरल मनोज पांडे ३१ मे रोजी निवृत्त होणार होते. मात्र. आता त्यांचा कार्यकाळ संरक्षण मंत्रालयाने एक महिन्याने वाढवला आहे.

(२६ मे) मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या सेवेत एक महिन्याची मुदतवाढ मंजूर केली आहे. मनोज पांडे हे ३१ मे २०२४ रोजी निवृत्त होणार होते, परंतु आता मनोज पांडे हे ३० जून २०२४ पर्यंत सेवा करतील, असे संरक्षण मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, मनोज पांडे यांची ३० एप्रिल २०२२ रोजी नियुक्ती झाल्यापासून ते लष्करप्रमुख पदावर कार्यरत आहेत.संरक्षण मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे की, मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने २६ मे २०२४ रोजी लष्करी नियम १९५४ च्या नियम १६ अ (४) अंतर्गत लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या सेवेत त्यांच्या सामान्य सेवानिवृत्तीच्या वयापासून (३१ मे २०२४) म्हणजे ३० जून २०२४ पर्यंत एक महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ मंजूर करण्यात आली आहे.मूळचे नागपूर येथील असलेले मनोज पांडे यांना भारतीय लष्कराचा प्रदीर्घ अनुभव आहे. जनरल मनोज पांडे यांची डिसेंबर १९८२ मध्ये अभियंता कॉर्प्समध्ये नियुक्ती झाली. त्यांनी आपल्या लष्करी कारकिर्दीत इंजिनिअर ब्रिगेड, नियंत्रण रेषेजवळ पायदळ ब्रिगेड, लडाख सेक्टरमधील माऊंटन डिव्हिजन आणि ईशान्येकडील कॉर्प्सचे नेतृत्व केले आहे. ईस्टर्न कमांडचा पदभार स्वीकारण्यापूर्वी त्यांनी अंदमान आणि निकोबार कमांडच्या कमांडर-इन-चीफची जबाबदारी सांभाळली होती. मनोज पांडे हे देशातील पहिले इंजिनियर असतील, ज्यांच्याकडे लष्करप्रमुखांची कमान सोपवण्यात आली आहे.

### 'एनडीए' ते लष्करप्रमुख

मनोज पांडे यांचे प्राथमिक शिक्षण नागपूर स्थित वायुसेना नगरातील केंद्रीय विद्यालयात झाले. अकरावी नंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून पुण्याच्या नॅशनल डिफेन्स अकॅडमीत दाखल झाले. त्यानंतर त्यांनी डेहराडूनमधील मिलिटरी इंजिनिअरिंग कॉलेजमधून अभियांत्रिकीची पदवी मिळवली. १९८२ मध्ये ते पुण्याच्या कोर ऑफ इंजिनिअर्स (बॉम्बे सॅपर्स) या लष्कराच्या अभियांत्रिकी सेवेत रुजू झाले.

कॅम्बर्ली (ब्रिटन) स्टाफ कॉलेज, महूचे आर्मी वॉर कॉलेज, दिल्लीच्या नॅशनल डिफेन्स कॉलेजमधून त्यांनी 'हायर कमांड कोर्स' केला आहे. आपल्या ३७ वर्षांच्या सेवेत मनोज पांडे यांनी ऑपरेशन विजय आणि ऑपरेशन पराक्रममध्ये देखील सक्रियरीत्या सहभागी झाले होते.

## पुन्हा शरद पवारांसोबत जाणार का? अजित पवारांनी दिलं स्पष्टीकरण



**पुणे :** गेल्यावर्षी राष्ट्रवादी पक्षात उभी फूट पडली. आमदारांच्या पाठिंब्याच्या जोरावर अजित पवारांनी राष्ट्रवादी पक्षावर दावा सांगितला. निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी पक्ष हा अजित पवार गटाचा असल्याचा निर्णय दिला. यानंतर शरद पवार आणि अजित पवार यांच्या भूमिकांची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा झाली. मात्र राजकारणात काहीही होऊ शकतं असं म्हटलं जातं. त्यामुळे अजित पवार आणि शरद पवार पुन्हा एकत्र येऊ शकतात का? असा प्रश्न सध्या चर्चेत आहे. यावर अजित पवारांनी स्वतः स्पष्टीकरण देत सूचक वक्तव्य केलं आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी यावर भाष्य केलं आहे.

आम्ही जी भूमिका घेतली आहे ती इतरांना योग्य वाटली तर पुढे काही होऊ शकतं, असं सूचक वक्तव्य अजित पवारांनी केलं आहे. आम्ही ज्यांच्यासोबत जाण्याची भूमिका घेतली आहे ती जर त्यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना योग्य वाटली, तर भविष्यात काही गोष्टी घडायच्या की नाही हे काळ ठरवेल, असंही अजित पवार म्हणाले.

## ४ जूननंतर राऊतांचे थोबाड फुटलेले दिसेल : प्रवीण दरेकर

**मुंबई-** उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी सामना दैनिकातील आपल्या रोखठोक सदरामध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर भाष्य केले आहे. त्यावर भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी रोखठोक प्रत्युत्तर दिले आहे.

आ. दरेकर म्हणाले की, ४ जूननंतर संजय राऊत यांचे थोबाड फुटलेले दिसेल. योगी आदित्यनाथ यांनी देशाची गरज मोदी आहेत, देशाच्या भविष्यासाठी मोदींची गरज आहे. हे जाहीर सभांमधून अनेकदा ठणकावून सांगितले आहे. मोदी-योगी असे चित्र उभे करू नका. संजय राऊत आपल्या पक्षाची, घराची काळजी करा. हा देश, आमचा पक्ष मोदींच्या नेतृत्वाखाली चालेल हे सर्वश्रुत आहे. संजय राऊत भ्रमिष्ठ झालेत म्हणून अशा प्रकारचे शोधून शोधून काही काढून प्रसिद्धीत राहण्याचा आणि नौटंकी करण्याचा प्रयत्न करताहेत.

दरेकर पुढे म्हणाले की, सामन्याच्या दाव्याला आम्ही काडीमात्र किंमत देत नाही. गडकरी त्यांच्याबाबतीतले वक्तव्य म्हणजे संजय राऊत यांचा मूर्खपणाचा कळस आहे. प्रचारात राज्यभर व्यस्त असतानाही देवेंद्रजींनी आणखी विजय भक्कम व्हावा यासाठी काय योगदान दिलेय हे नागपूरवासियांना माहित आहे. संजय राऊत यांचे दुटप्पी बोलणे आहे. अगोदर बोलायचे विरोधात रसद पुरवली, नंतर बोलायचे प्रचारात उतरले. संजय राऊत नेमके टीका करतानाही काय बोलायचे हे निश्चित करून घ्या, असा टोलाही दरेकरांनी लगावला.

## कोलकाता नाईट रायडर्स 'आयपीएल' विजेता

### हैदराबादचा ८ गडी राखून पराभव

**चेन्नई, :** कोलकाता नाईट रायडर्स आयपीएल २०२४ चा चॅम्पियन संघ ठरला आहे. सनरायझर्स हैदराबादचा ८ विकेट्सने पराभव करत मोठा विजय नोंदवला. हैदराबादने केकेआरला विजयासाठी अवघ्या ११४ धावांचे सोपे आव्हान दिले होते. कोलकाता संघाने अवघ्या षटकांत हे आव्हान सहज गाठले. व्यंकटेश अय्यर आणि रहमानउल्ला गुरबाजच्या ९१ धावांच्या भागीदारीच्या जोरावर झटपट धावा केल्या. व्यंकटेश अय्यरने २६ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकार लगावत ५२ धावा केल्या तर आंद्रे रसेलने ३ विकेट्स घेत चेंडूने चांगली कामगिरी केली. तर केकेआरच्या गोलंदाजांनी अंतिम सामन्यात चेंडूने हाहाकार केला.

रविवारी चेपॉक मैदानावर हैदराबादने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला आणि १८.३ षटकांत सर्वबाद ११३ धावा केल्या. कोलकाताने ११४ धावांचे लक्ष्य १०.३ षटकात २ गडी गमावून पूर्ण केले. व्यंकटेश अय्यरने २६ चेंडूत ५२ धावांची नाबाद खेळी केली. रहमानउल्ला गुरबाजने ३२ चेंडूत ३९ धावा केल्या. आंद्रे रसेलने गोलंदाजीत ३ बळी घेतले.

केकेआरने १० वर्षांनंतर पुन्हा ट्रॉफीवर आपले नाव कोरले आहे. कोलकाताने तिसर्यांदा आयपीएलचे विजेतेपद पटकावले आहे. यापूर्वी गौतम गंभीरच्या नेतृत्वाखाली केकेआरने २०१२ आणि २०१४ मध्ये ट्रॉफी जिंकली होती. चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात सनरायझर्स हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत ११३ धावा केल्या.

प्रत्युत्तरात कोलकाताने सहज लक्ष्य गाठले.

अंतिम सामन्यात केकेआर संघाच्या गोलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीनंतर संघाच्या फलंदाजांकडून अशाच खेळाची अपेक्षा होती. कोलकाता नाईट रायडर्स संघाची सुरुवात चांगली झाली नाही ज्यात त्यांनी ११ धावांवर सुनील नारायणच्या रूपात पहिली विकेट गमावली, जो केवळ ६ धावा करत पॅट कमिन्सचा बळी ठरला. यानंतर फलंदाजीला आलेल्या व्यंकटेश अय्यरने रहमानउल्ला गुरबाजसह आक्रमक खेळी करत संघाची धावसंख्या पहिल्या ६ षटकांत १ गडी गमावून ७२ धावांवर नेली. या सामन्यात दोघांनी दुसर्या विकेटसाठी ४५ चेंडूत




९१ धावांची भागीदारी करून सामना पूर्णपणे एकतर्फी केला. गुरबाजच्या बॅटमधून ३९ धावांची खेळी पाहायला मिळाली. तर व्यंकटेश अय्यर या सामन्यात संघाला विजेतेपद मिळवून देऊन परतला ज्यात त्याने ५२ धावांची उत्कृष्ट खेळी केली.

हैदराबादसाठी या सामन्यात पॅट कमिन्स आणि शाहबाज अहमद यांनी गोलंदाजीत १-१ विकेट घेतली.

## स्वामी शांतिगिरीजी महाराज वाराणसीत नरेंद्र मोदींचा प्रचार करणार

**नाशिक :** नाशिक लोकसभा मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांसमोर अपक्ष उमेदवार स्वामी शांतीगिरीजी महाराज यांनी तगडे आव्हान उभे केले होते. त्यामुळे नाशिकची लढत राज्यात चांगलीच गाजली. परंतु आता शांतीगिरीजी महाराज वाराणसी येथे रवाना झाले असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ते भक्त परिवारासह प्रचार करणार आहे. महायुतीचे उमेदवार गोडसे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार वाजे यांच्या समोर स्वामी शांतीगिरीजी महाराज निवडणुक रिंगणात होते. नाशिकमध्ये कोण बाजी मारणार हे ४ जूनला स्पष्ट होणार आहे.

मोदी वाराणसी लोकसभा मतदारसंघातून निवडणुकीसाठी उभे आहेत. त्यातच आता शांतीगिरीजी महाराजांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींचा प्रचार करण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिक लोकसभेची निवडणूक शांतिगिरी अपक्ष लढवली. शांतीगिरी महाराज मोदींच्या प्रचारासाठी वाराणसीला जाणार असल्याने आश्चर्य व्यक्त होत असेल तरी शांतीगिरीजी महाराज यांनी नाशिक च्या निवडणुकी दरम्यान पंतप्रधान मोदींच्या कटआऊटला पुष्पहार अर्पण करून नाशिक वगळता रज्यभरतील जय बाबाजी भक्त परिवाराला महायुतीला मतदान करण्याचे संकेत दिले होते. महाराजांनी २००९ मध्ये संभाजी नगरयेथे लोकसभा लढवत दीड लाखाहून अधिक मते घेतली होती. नाशिक, दिंडोरी, जालना, धुळे, संभाजी नगर, जळगाव या ठिकाणी निर्णायक असलेल्या जय बाबाजी परिवारचे मतदान



महायुतीला निश्चितच लाभदायक ठरणार आहे.

स्वामी शांतिगिरी महाराज यांची भाजपचे संकट मोचक म्हणून ओळख असलेल्या गिरीश महाजन यांनी निवडणूक अर्ज माघारीच्या अगोदर भेट घेतली होती. त्यात दोघांमध्ये सुमारे तासभर चर्चा देखील झाली होती. महाराज माघार घेतील अशी चर्चा देखील सुरू होती. परंतु महाराजांनी आता लढायचं आणि जिंकायचं असा निर्धार करत निवडणूक आखाड्यात शेवटपर्यंत राहिले. तत्पूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील महाराजांनी भेट घेतली होती. आता थेट पंत प्रधान मोदींचा प्रचार करणार असल्याने नाशिक मध्ये महाराजांना भाजपचा छुपा पाठिंबा तर नव्हता ना? असा सवाल मतदारांमध्ये केला जात आहे.

### नरेंद्र मोदी राजकारणातील आदर्श

**वाराणसीत जय बाबाजी भक्त परिवार आहे, मोदी हे वाराणसीत साधू महंतांची भेट घेणार आहोत. मोदी राजकारणातील आदर्श असल्याने जय बाबाजी भक्त परिवार त्यांच्या प्रचारासाठी जात आहे. भाजपमध्ये प्रवेश करण्या बाबत लोकसभा निकाला नंतर ठरवू.**

**- महामंडलेश्वर शांतीगिरी महाराज**

## संपादकीय

# सध्या तरी शांतता!

गलवान खोर्यातील संघर्षानंतर भारत आणि चीन मधील संबंध ताणल्या गेले होते. युद्धाचा भडका उडतो की काय अशी स्थिती निर्माण झाली होती. अर्थात तणाव कायम राहिला परंतू स्फोट झाला नाही. नंतरच्या काळात याच संघर्षादरम्यान चीनने भारताची भूमी बळकावली, असाही आरोप झाला. त्याचे समाधानकारक उत्तर अद्याप मिळालेले नाही. चीन हा भारतासाठी कायम डोकेदुखीचा विषय राहिला आहे. गेल्या काही वर्षात या दोन्ही देशांदरम्यान अनेकदा तणावाचे प्रसंग आले, पण थेट संघर्ष झाला नाही. कदाचित अमेरिकेचा दबाव हे देखील त्यामागचे एक कारण असू शकते. अमेरिका आणि चीन यांच्यातही कायम तणाव असतो. अर्थात दोन्ही देशांची आर्थिक आणि लष्करी ताकद पाहता त्यांच्यात थेट संघर्ष होण्याची शक्यता तशी कमीच आहे, परंतू अमेरिका भारताची कायम पाठराखण करेलच याची शाश्वती नाही. त्यामुळे भविष्यात चीनने भारताच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतलीच तर भारताची मोठी अडचण होऊ शकते. त्यातच एरवी भारताच्या मदतीला धावून येणारा रशिया आता चीन सोबत अधिक जवळीक साधत असल्याचे दिसते. चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग नुकतेच रशियाच्या दौर्यावर गेले होते आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यासह दोघांनी एकत्रितपणे अमेरिकेवर टीका केली. गेली अनेक वर्षे रशिया भारताचा मित्र आहे. त्या पृष्टभूमीवर चीन- रशियाची ही जवळीक भारतासाठी काळजीचा विषय ठरू शकते.

खरे तर रशिया आणि चीन या दोन्ही देशांमध्ये कम्युनिस्ट राजवटी असल्या तरी हे दोन्ही देश भूतकाळात कधीही एकमेकांचे मित्र नव्हते. एकच विचारसरणी असूनही त्यांच्यात कधी सुप्त, कधी व्यक्त शत्रुत्वच दिसून आले. हे दोन्ही देश आज इतक्या वर्षांनी एकमेकांच्या जवळ आले आहेत, याचे प्रमुख कारण अमेरिका हेच आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिकेला आपण जगाचे एकमेव दादा आहोत असे वाटू लागले होते. अमेरिकेच्या या धारणेला ' नऊ - अकरा ' च्या हल्ल्याने जबर तडाखा दिला. त्याच दरम्यान किंवा आधीपासूनच चीनच्या बाजारकेंद्री आर्थिक धोरणांना आकार येऊ लागला होता. चिनी उत्पादने जगभरच्या बाजारपेठांमध्ये जागा व्यापत होती. त्यामुळे चीन आर्थिक महासत्ता बनू लागला होताच. वाढत्या धनसंपत्तीच्या आधारावर चीनने शस्त्रसामग्रीदेखील अद्ययावत करण्यास प्रारंभ केला. त्याच काळात अमेरिकेतील लेहमन ब्रदर्स बँकेचे पतन झाले. त्याचा आर्थिक फटका अमेरिकी अर्थव्यवस्थेला बसला. परिणामी नंतरच्या दशकात चिनी अर्थव्यवस्था जपान, जर्मनी, उर्वरित युरोपला मागे सारत थेट अमेरिकेशी स्पर्धा करू लागली. आज परिस्थिती अशी आहे, की चिनी मालाला रोखण्यासाठी अमेरिकेला आयात आणि इतर शुल्कामध्ये प्रचंड वाढ करावी लागत आहे.मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणार्या देशावरच आज ही परिस्थिती ओढवली आहे. दुसरीकडे रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर अमेरिका आणि युरोपिय समुदायाने रशियाला एकाकी पाडण्याचा चंग अमेरिकेने बांधला. या मोक्याच्या क्षणी रशियाला चीनची साथ मिळाली. अमेरिका आणि मित्र राष्ट्रांचा उदारमतवादी गट एकीकडे, तर चीन व रशिया, इराण आदी लोकशाहीविरोधी राष्ट्रांचा गट दुसरीकडे अशी सध्या जगाची विभागणी झाल्याचे दिसते.

अमेरिकेला भारताने त्यांच्या कंपूत सामील व्हावे असे वाटते. त्यामागे अर्थात अमेरिका-चीन व्यापार युद्धाचीही बाजू आहे. भविष्यात चीनऐवजी भारताला जागतिक उत्पादनाचे केंद्र बनवावे यासाठी अमेरिकी कंपन्या प्रयत्नशील आहे.

याशिवाय ऊर्जा आणि शस्त्रसामग्री यांबाबत रशियावरील अवलंबित्व भारताने कमी करावे असेही अमेरिकेचे प्रयत्न आहेत.

यामुळेच या तिन्ही देशांशी स्वतःचे हितसंबंध साभाळून पावले उचलण्याचे खडतर आव्हान भारतासमोर आहे. १९६२मधील भारत-चीन युद्धाच्या वेळी त्यावेळच्या सोव्हिएत महासंघाने चीनची बाजू घेतली होती, तर १९७१मधील भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी पाकिस्तान-चीन-अमेरिका या आघाडीविरोधात रशिया भारताच्या बाजूने भक्कमपणे उभा राहिला.

या तीन देशांच्या परस्परसंबंधांचे असे विरोधी आयाम अनेक बाबतींत आढळतील. ते जवळपास आजही कायम आहेत.

भारत हा रशिया आणि चीन या दोघांचाही बडा ग्राहक आहे. त्यामुळे दोन्ही देश परस्परांच्या कितीही जवळ आले, तरी केवळ तेवढ्यावरून रशिया भारताला अंतर देण्याची शक्यता कमी दिसते. तसेच सीमा वाद असूनही भारतीय बाजारपेठ चिनी मालासाठी आणि चिनी अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भारतासाठी ही बाब दिलासादायक म्हणावी अशी आहे.

रशिया आजही सामरिक सामग्रीचा आणि इंधनाचा मोठा निर्यातदार आहे. त्यामुळे त्या देशाच्या अर्थव्यवस्थेसाठीही भारताचे महत्त्व टिकून आहे. ही सगळी परिस्थिती पाहता भारताला खूप काळजी करण्याचे तसे कारण दिसत नाही, परंतु भारताने अखंड सावध राहायला हवे.

# 'रक्ताचे नाते चॅरिटेबल ट्रस्ट' तर्फे महिलांची मोफत कर्करोग तपासणी

**पुणे :** रक्ताचे नाते चॅरिटेबल ट्रस्ट,लायन्स क्लब (सहकारनगर) आणि लायन्स राहतेकर वूमन कॅन्सर डायग्नॉस्टिक सेंटर(एल आर सी सी) यांच्यातर्फे स्त्री रोग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित शिबिरात महिलांची मोफत कर्करोग तपासणी करण्यात आली .शनिवार,दि.२५ मे २०२४ रोजी सकाळी १० ते २ यावेळेत मामलेदार कचेरी समोर हे शिबीर पार पडले. 'रक्ताचे नाते चॅरिटेबल ट्रस्ट' च्या नवीन कार्यालयाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने हे शिबीर आयोजित करण्यात आले.




शिबिराच्या उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी १२५ वेळा रक्तदान करणारे प्रदीप कपिले हे होते. त्यांनी आपल्या इच्छाशक्तीने कॅन्सर वर मात केली आहे. सौ.निर्मलाताई हेडा आणि सत्यविजय हेडा यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.'महिलांमधील कॅन्सरचे प्रमाण वाढत असल्याने वेळीच तपासणी करून घ्यावी.दर पंधरा दिवसांनी असे तपासणी शिबिर घेण्यात येणार आहे.पुढील शिबिर ९ जून रविवारी होणार आहे',असे 'रक्ताचे नाते ट्रस्ट 'चे अध्यक्ष राम बांगड यांनी यावेळी सांगितले.

श्री मुरलीधर महिला मंडळाचे सहकार्य शिबीर आयोजनात लाभले. राम बांगड,चंद्रकला बांगड,पद्मा झंवर यांच्यासह अनेक मान्यवर उदघाटन प्रसंगी उपस्थित होते.या शिबिरात १०० महिलांची तपासणी करून त्यांना मोफत सल्ला देण्यात आला. महात्मा फुले मंडळाचे अध्यक्ष मधुकर राऊत यांनीही यावेळी मार्गदर्शन केले.

# अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक घेतले जाणार नाहीत

### शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांचे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना आश्वासन

**मुंबई -** शालेय शिक्षण अभ्यासक्रमात मनुस्मृतीतील श्लोकांचा समावेश करण्यास रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी तीव्र विरोध केला आहे.याबाबत आठवले यांनी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून मनुस्मृती चे श्लोक अभ्यासक्रमात घेण्याबाबत तीव्र विरोध दर्शविला. यावेळी दोघांमध्ये झालेल्या चर्चेत दीपक केसरकर यांनी शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक येणार नसल्याचे ठोस आश्वासन आठवले यांना दिले आहे.त्यामुळे शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक घेण्याच्या विषयाला पूर्णविराम मिळालेला आहे.


महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले आहे. जातीभेद विषमता आणि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या भेदभावाच्या अनेक बाबी मनुस्मृतिमध्ये असल्यामुळे मानवतेच्या हक्कासाठी; विषमता आणि जातीभेदाच्या अमानुष रूढी परंपरे विरुद्ध संगर म्हणून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे मनुस्मृती चे दहन करून सामाजिक क्रांति केली. त्यामुळे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जाळलेल्या मनुस्मृतीचे श्लोक अभ्यासक्रमात घेण्यास आंबेडकरी जनतेचा तीव्र विरोध असल्याचे ना.रामदास आठवलेंनी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना दूरध्वनी द्वारे सांगितले.

त्यावर केसरकर यांनी मनुस्मृती चे श्लोक अभ्यासक्रमात घेणार नसल्याचे आश्वासन आठवलेंना दिले.

# रामकृष्ण मिशनने शाळांमध्ये जावून विद्यार्थ्यांना संस्कारित करावे : राज्यपाल रमेश बैस

## रामकृष्ण मिशन मुंबईच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण

**मुंबई :** शिक्षणाला मूल्यांची जोड नसली तर ते शिक्षण केवळ व्यक्तीचा अहंकार वाढवते. त्यामुळे शिक्षणाला मूल्य, नीतिमत्ता व मानवतेची जोड देणे गरजेचे आहे, असे सांगून रामकृष्ण मिशन मुंबईने शाळांशी रचनात्मक सहकार्य प्रस्थापित करावे, शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना संस्कारित करावे, असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले.




खार मुंबई येथील रामकृष्ण मठ व मिशनच्या वर्षभर चाललेल्या शताब्दी वर्षाची सांगता आज बालगंधर्व रंगमंदिर वांद्रे मुंबई येथे झाली, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला रामकृष्ण मिशन बेलूर मठ येथील उपाध्यक्ष स्वामी दिव्यानंद, सहायक सचिव बलभद्रानंद, मुंबई रामकृष्ण मठाचे अध्यक्ष सत्यदेवानंद, सुशीम दत्ता, शंतनू चौधरी तसेच रामकृष्ण मठाच्या विविध केंद्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

रामकृष्ण मिशनचे संस्थापक स्वामी विवेकानंद महिला सक्षमीकरणाचे खंदे पुरस्कर्ते होते, असे सांगून रामकृष्ण मिशन मुंबई केंद्राने गरीब व वंचित महिलांसाठी कौशल्य विकास उपक्रम राबवून त्यांना आत्मनिर्भर बनवावे, असे आवाहन राज्यपाल बैस यांनी केले.

रामकृष्ण मिशन ही आत्मोद्धारासोबत लोकहिताचे सामाजिक कार्य करीत असल्याबद्दल मिशनचे अभिनंदन करून मिशनने भारतातील युवकांसाठी कौशल्य विकास, क्रीडा विकास व समग्र व्यक्तिमत्व विकासासंबंधी उपक्रम राबवावे. तसेच वरिष्ठ नागरिक व दिव्यांगांच्या सशक्तीकरणाची योजना राबवावी, असे ही त्यांनी सांगितले.

विविध आजारांच्या उपचारासाठी मुंबईत येणाऱ्या रुग्णांसाठी तसेच त्यांच्या नातलगांसाठी निवासी व्यवस्था असलेले 'माँ शारदा भवन' निर्माण केल्याबद्दल मिशनचे कौतुक करून रामकृष्ण मिशनतर्फे ठाणे येथे नवे केंद्र सुरु करण्यात येत असल्याबद्दल राज्यपाल बैस यांनी आनंद व्यक्त केला.

## १४२८ नापास विद्यार्थी देणार बारावीची सप्लिमेंटरी परीक्षा

**अकोला :** राज्य मंडळातर्फे बारावीच्या परीक्षेतील अनुत्तीर्ण विद्यार्थी आणि श्रेणी सुधार करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्टमध्ये पुरवणी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठीचा प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांना नियमित शुल्कासह २७ मे ते ७ जून आणि विलंब शुल्कासह ८ ते १२ जून यादरम्यान भरता येणार असल्याचे विभागीय शिक्षण मंडळाकडून सांगण्यात आले. जिल्ह्यातील १ हजार ४२८ विद्यार्थी नापास झाले आहेत. या विद्यार्थ्यांना अर्ज भरता येणार आहे.

बारावीच्या परीक्षेत जिल्ह्यात कला शाखेच्या ७ हजार ८६६ विद्यार्थ्यांपैकी ६ हजार ८९७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत; तर ९६९ विद्यार्थी नापास झाले आहेत. विज्ञान शाखेच्या १३ हजार ५७० पैकी १३ हजार २५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, केवळ ३२० विद्यार्थी नापास झाले आहेत, तर वाणिज्य शाखेच्या २ हजार ८५ विद्यार्थ्यांपैकी १ हजार ९४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. केवळ १३९ विद्यार्थी नापास झाले आहेत.

# मुंबईत पावसाची शक्यता, मराठवाड्यातही विजांच्या कडकडाटासह बरसणार

महाराष्ट्रात राजधानी मुंबईसह विविध जिल्ह्यांमध्ये मागील काही दिवसांपासून मान्सूनपूर्व पाऊस हजेरी लावत असल्याचं चित्र आहे. अशातच प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार पुढील २४ तासांत मुंबई शहर आणि उपनगरात हलक्या पावसाची शक्यता असून आकाश अंशतः ढगाळ राहील. तसंच शहरात कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे ३४ अंश सेल्सिअस आणि २९ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, आणि सोसाट्याचा वारा (४०-५० किमी प्रतितास वेग), हलका ते माध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, आणि सोसाट्याचा वारा (३०-४० किमी प्रतितास वेग), हलका ते माध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, एकीकडे पाऊस कोसळत असताना अकोला येथे ४५.६ओ सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. तर दुसरीकडे, धाराशिव येथे २२.0ओ सेल्सिअस हे सर्वात कमी किमान तापमान होते.

### उष्णतेच्या लाटेचा इशारा

**धुळे, जळगाव, अकोला, चंद्रपूर, परभणी, हिंगोली, नांदेड पुढील ४८ तासांत उष्णतेची लाट येणार असून, सायंकाळी पावसाची शक्यता आहे. यातील अकोला, चंद्रपुरात सर्वाधिक तापमान असेल, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.**

## फलटण तालुक्यातील आदर्की सर्कलमध्ये

# आतापर्यंत सर्वात जास्त ९९.५ मिमी पावसाची नोंद

गेल्या १५ दिवसांत फलटण तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला असून आजपर्यंत तालुक्यात सरासरी एकूण ४२.३ मिमी पाऊस झाला आहे. हा पाऊस मे महिन्याच्या सरासरी पाऊसापेक्षा १७४ % जादा आहे. हा पाऊस पाच दिवस पडला.

**तालुक्यातील सर्कलनुसार पडलेला पाऊस मिलीमीटरमध्ये (कंसात टक्केवारी) खालीलप्रमाणे...**


- फलटण - ५१.० (२०९.९)
- आसू - २३.२ (९५.५)
- होळ २८.९ (११८.९)
- गिरवी ५८.३ (२३९.९)
- आदर्की ९९.५ (४०९.५)
- वाठार ३७.३ (१५३.५)
- बरड १७.७ (७२.८)
- राजाळे २४.२ (९९.६)
- तरडगाव ४०.५ (१६६.७)

## दोन दिवसात एक हजाराने वाढली तूर

**नागपूर :** तूरीसोबत तूर डाळीच्या किमतीतही वाढ होत आहे. कळमना धान्य बाजारात केवळ दोनच दिवसात तूर डाळीचे भाव एक हजार, हरभरा ५०० रुपये आणि मिल क्वालिटी गव्हाचे भाव प्रति क्विंटल १०० रुपयांनी वाढले आहेत. भाववाढीसाठी यावर्षी उत्पादन कमी असल्याचे कारण सांगितले जात आहे.

कळमन्यात शनिवारी एक हजाराच्या दरवाढीसह तूरीचे ११,५०० ते १२,९५० रुपये प्रति क्विंटल भावाने सौदे झाले. दररोज एक हजार पोत्यांची आवक आहे. याशिवाय हरभऱ्यात प्रति क्विंटल ५०० रुपयांची वाढ झाली असून भाव दर्जानुसार ६,५०० ते ६,९०० रुपये आहेत. दररोज २ हजार पोत्यांची आवक आहे. गव्हाच्या भावातही तेजी दिसून आली. मिल क्वालिटीचे भाव प्रति क्विंटल १०० रुपयांनी वाढून २,४०० ते २,६०० रुपयांवर पोहोचले. दररोज हजार पोत्यांची आवक असल्याचे धान्य बाजार असोसिएशनचे पदाधिकारी कमलाकर घाटोळे यांनी सांगितले.

**स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांची पुण्यतिथी आहे. जवाहरलाल नेहरूंचा २७ मे १९६४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यु झाला होता. पण नेहरू आजही देशवासियांच्या हृदयात आहेत.**



जवाहरलाल नेहरूंचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे झाला होता. त्यांच्या वडिलांचे नाव मोतीलाल नेहरू तर आईचे नाव स्वरूपरानी होते. जवाहरलाल नेहरू कश्मीरी पंडित समुदायातून होते. यामुळे त्यांना पंडित नेहरू म्हटले जात असे. नेहरूंना लहान मुले फार आवडत असत. मुले त्यांना चाचा नेहरू म्हणून हाक मारत होते.

जवाहरलाल नेहरूंनी कॅम्ब्रिज विद्यापीठातून लॉचे शिक्षण घेतले होते. त्यानंतर १९१२ मध्ये भारतात परतल्यानंतर त्यांनी वकिली करण्यास सुरूवात केली. ते १९१९ मध्ये महात्मा गांधींच्या संपर्कात आले. ते गांधींच्या विचारांमुळे प्रभावित झाले. नेहरू गांधींप्रमाणेच कुर्ता आणि टोपी परिधान करण्यास सुरुवात केली. देशाच्या स्वातंत्र्यात नेहरूंचे मोठे योगदान होते. १९४२ च्या मभारत छोडोफ आंदोलनादरम्यान त्यांना ९ ऑगस्ट १९४२ रोजू मुंबईतून अटक करण्यात आली होती आणि अहमदनगर येथील तुरूंगात ठेवण्यात आले होते. १५ जून १९४५ रोजी त्यांची येथून सुटका करण्यात आली.

पंडित नेहरूंना आधुनिक भारताचे जनक म्हटले जाते. त्यांनी पंचवर्षीय योजनांचा शुभारंभ केला होता. १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान बनले. पंडित नेहरू १९४७ ते २७ मे १९६४ पर्यंत भारताचे पंतप्रधान राहिले.

### जवाहरलाल नेहरूंविषयी १० गोष्टी

जवाहरलाल नेहरूंच्या आयुष्याशी निगडीत गोष्टी

१. पंडित जवाहरलाल नेहरूंचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे झाला होता. जवाहरलाल पंडित मोतीलाल नेहरू आणि स्वरूपरानी यांच्या चार मुलांमधील जेष्ठ पुत्र होते.

२. जवाहरलाल नेहरूंना इंग्लिश, हिंदी आणि संस्कृत भाषेचे उत्तम ज्ञान होते. नेहरू शिक्षणासाठी १९०५ मध्ये ब्रिटनला गेले होते. त्यांनी तेथील कॅम्ब्रिज विद्यापीठातून लॉ चे शिक्षण घेतले.

३. जवाहरलाल नेहरूंचे १९१६ मध्ये कमला नेहरू यांच्यासोबत विवाह केला. लग्नाच्या एका वर्षानंतर त्यांनी एका मुलीला जन्म दिला. इंदिरा प्रियदर्शनी असे मुलीचे नाव होते.

४. पंडित नेहरू हे लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवणारे पहिले व्यक्ती होते.

५. जवाहरलाल नेहरू सिगारेटचे शौकिन होते. ते प्रत्येक ठिकाणी सिगारेट ओढताना दिसायचे. एकदा नेहरू भोपाळला आले होते. तेव्हा तेथे त्यांच्या ५५५ ब्रँडची सिगारेट संपली होती. भोपाळमध्ये कोठेही त्यांचा सिगारेटचा ब्रँड भेटला नाही. यानंतर एका विशेष विमानाने इंदूनहून सिगारेट मागविण्यात आली होती.

६. जवाहरलाल नेहरूंना एकदा लंडनला जायचे होते. त्यांचा न्हावी नेहमीच उशिरा येत होता. नेहरूंनी त्याच्याकडे विचारणा केली असता तो म्हणाला - माझ्याकडे घड्याळ नाहीये. यामुळे मला नेहमीच उशीर होत असतो. यानंतर नेहरूंनी त्याच्यासाठी लंडनहून नवीन घड्याळ आणली होती.

७. भारतीय महिला सौंदर्य उत्पादनांतर प्रचंड प्रमाणात परकिय चलन खर्च करीत असल्यामुळे पंडित नेहरू चिंतेत होते. त्यांनी जेआरडी टाटांकडे सौंदर्य प्रसाधने निर्माण करण्याचे निवेदन केले. यानंतर लॅक्मे हा सौंदर्य प्रसाधन ब्रँड भारतीय बाजारपेठेत आला.

८. जवाहरलाल नेहरू एक उत्तम लेखक देखील होते. मडिस्कव्हरी ऑफ इंडिया आणि मग्लिम्प्स ऑफ वर्ल्ड हिस्ट्रीफ ही त्यांची नावाजलेली पुस्तके आहेत.

९. नेहरूंना आपल्या उभ्या आयुष्यात ९ वेळेस तुरूंगवास भोगावा लागला. आपल्या देशसेवेसाठी त्यांना १९५५ रोजी भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

१०. २७ मे १९६४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने नेहरूंचे निधन झाले.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# ९१ हजार दूध उत्पादकांना ७६ कोटींचे अनुदान

## सर्वाधिक लाभार्थी संगमनेर, राहुरी, राहाता तालुक्यांत

**अहमदनगर :** राज्य सरकारच्या दूध अनुदान योजनेचा लाभ आतापर्यंत नगर जिल्ह्यातील ९० हजार ५६६ हजार दूध उत्पादक शेतकर्यांना झाला असून, या अनुदानापोटी ७६ कोटी ८ लाख ५६ हजार ७९५ कोटी रुपये शेतकर्यांच्या बँक खात्यात वर्ग झाले आहेत. पशुसंवर्धन विभागाने राज्य सरकारच्या सुचनेनुसार कमी कमीत वेळेत पूशपालकांसह जनावरांचे टॅगिंग आणि अन्य ऑनलाईन माहिती संकलित केल्याने ऐवढ्या मोठ्या प्रमाणात अनुदान देत येणे शक्य झाले आहे.



राज्य सरकारच्या वतीने दूध उत्पादक शेतकर्यांना दिलासा देण्यासाठी महसूल तथा पशूसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काही महिन्यांपूर्वी दूध उत्पादक शेतकर्यांना दिलासा देण्यासाठी ५ रुपये अनुदानाची योजना सुरु केली होती. त्यानंतर तांत्रिक बाबी पूर्ण करणे, अनुदान देण्यासाठी शेतकर्यांचे रेकॉर्ड तयार करणे, शेतकर्यांसह जनावरांची माहिती, दुधाचे उत्पादन याची माहिती ऑनलाईन करण्यात काही कालावधी गेला. मात्र, पशूसंवर्धनाने आतापर्यंत जिल्ह्यातील ९० हजारांहून अधिक

शेतकर्यांना दुधाचे अनुदान देण्यात यश मिळवले आहे. या योजनेत दूध उत्पादक शेतकर्यांना ११ जानेवारी ते १० मार्च या कालावधीत अनुदान मंजूर करण्यात आले आहे. या योजनेत सर्वाधिक लाभ हा संगमनेर तालुक्यातील दूध उत्पादक शेतकर्यांना देण्यात आला असून तालुक्यातील २३ हजार ३०४, राहुरी १२ हजार ६० आणि राहाता १० हजार ८५३ शेतकर्यांना दुधाचे अनुदान मंजूर झालेले आहे. तालुकानिहाय आकडेवारीत अकोले तालुक्यातील ५ हजार ८२० शेतकर्यांना ३ कोटी ६८ लाख १० हजार १७५, संगमनेर तालुक्यातील २३ हजार ३०४ शेतकर्यांना १६ कोटी १५ लाख ७७ हजार २५५, कोपरगाव तालुक्यातील ७ हजार ९५० शेतकर्यांना ५ कोटी १३ लाख ९५ हजार ९२०, राहाता तालुक्यातील १० हजार ८५३ शेतकर्यांना ७ कोटी ८८ लाख ६६ हजार ३५, श्रीरामपूर तालुक्यातील ५ हजार १२१ शेतकर्यांना ३ कोटी ७८ लाख ५९ हजार १५५, नगर तालुक्यातील ४ हजार १७७ शेतकर्यांना ३ कोटी ३ लाख ८९ हजार ७२५, नेवासा तालुक्यातील ३ हजार ३९९ शेतकर्यांना ३ कोटी ५१ लाख ६७ हजार ४०५, पारनेरमध्ये ५ हजार ९६७ शेतकर्यांना ६ कोटी २८ लाख ३६ हजार ४४५, पाथर्डी तालुक्यातील २ हजार ३८१ शेतकर्यांना २ कोटी ५९ लाख ७० हजार २६५, राहुरी तालुक्यातील १२ हजार ६० शेतकर्यांना ११ कोटी ८० लाख ४० हजार ९० आणि श्रीगोंदा तालुक्यातील ३ हजार १५१ शेतकर्यांना ३ कोटी ८५ लाख ५६ हजार २७०, शेवगाव ४२६ शेतकर्यांना ४६ लाख ४३ हजार ४३५, जामखेडमधील १ हजार ५३३ शेतकर्यांना २ कोटी ७८ लाख ४ हजार ७०० आणि कर्जत ४ हजार ४६० शेतकर्यांना ५ कोटी ७९ लाख ५९ हजार ९२० एवढे अनुदान प्राप्त झाले आहे.

जिल्ह्यातील काही शेतकरी शेजारील जिल्ह्यातील दूध संघाना दूध पुरवठा करत आहेत. अशा शेतकर्यांची माहिती विभागाने संकलित केली असून हे दूध उत्पादक शेतकरी अनुदानापासून वंचित राहु नयेत म्हणून, त्यांनाही अनुदनाचा लाभ देण्यात येत आहे. अनुदानापासून शेतकरी वंचित राहू नयेत, यासाठी पूशसंवर्धन विभागासह राज्य सरकार प्रयत्न करत आहे.

**अनुदानासाठी रेट कमी करण्याचा खेळ?**

राज्य सरकारने दूध उत्पादक शेतकर्यांना दिसाला देण्यासाठी, त्यांची आर्थिक घडी बसवण्यासाठी अनुदान देण्याची घोषणा केली. मात्र, अनुदानाच्या मलिद्यासाठी राज्यात काही संघाकडून जाणीवपूर्वक शेतकर्यांच्या दूधाचे भाव कमी करण्यासाठी लॉबिंग करण्यात येत असल्याची चर्चा आहे. यामुळे राज्य सरकारने यावर लक्ष ठेवून संबंधीतांना वेळीच रोखण्याची वेळ आली आहे.

**शेतकर्यांची माहिती संकलन सुरू**

जिल्ह्यात दक्षिणेतील विशेष करून कर्जत आणि जामखेडसह अन्य तालुक्यातील सुमारे २५ ते ३० हजार शेतकर्यांची माहिती संकलित होण्याची प्रक्रिया सुरू असून त्यांना देखील लवकरच अनुदान अदा करण्यात येणार असल्याचे दुग्ध विकास आणि पशुसंवर्धन विभागाच्यावतीने सांगण्यात आले. यासह राज्य शेतकर्यांना आणखी दिलासा देण्यासाठी योजनेला मुदत वाढण्याच्या तयारीत आहे.


# नाशकात आयकर विभागाची मोठी कारवाई; ३० तास धाड अन् सापडले २६ कोटींचे घबाड

गेल्या काही दिवसांपासून आयकर विभाग कर बुडविणाऱ्यांविरोधात चांगलाच सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. नुकतेच आयकर विभागाने नांदेडमध्ये छापेमारी करत कोट्यवधींचे घबाड जप्त केले होते. त्यानंतर आता नाशिकमध्ये देखील आयकर विभागाकडून अशीच एक मोठी कारवाई करण्यात आली आहे. नाशकातील एका सराफ व्यावसायिकाशी संबंधित मालमत्तांवर आयकर विभागाकडून छापेमारी करण्यात आली असून या छापेमारीत तब्बल २६ कोटी रुपयांची रोकड आणि ९० कोटींच्या बेहिशोबी मालमत्तेचे दस्तावेज जप्त करण्यात आले आहेत. आयकर विभागाच्या या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून सराफ व्यावसायिकांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आयकर विभागाची ही कारवाई सलग ३० तास चालली असून या कारवाईसाठी नाशिक, नागपूर आणि जळगावचे अधिकारी एकत्र आले होते. तसेच ज्यावेळी आयकर विभागाच्या पथकाने छापेमारी केली त्यावेळी या सराफ व्यावसायिकाच्या एका खोलीत पाचशे रुपयांच्या चलनी नोटांचा खच आढळून आला. ही रक्कम इतकी मोठी होती की, रक्कम मोजण्यासाठी या अधिकाऱ्यांना तब्बल १४ तास लागले. यानंतर जप्त केलेली रक्कम नेण्यासाठी आयकर विभागाला एकूण सात कार बोलवाव्या लागल्या. या कारवाईत आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकूण २६ कोटींची रोकड आणि ९० कोटींच्या बेहिशोबी मालमत्तेचे दस्तावेज जप्त केले. दरम्यान, ५० ते ५५ अधिकाऱ्यांनी ही कारवाई केली असून आयकर विभागाच्या या पथकाने या सराफ व्यावसायिकाच्या शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी असलेले कार्यालय, खासगी लॉकर्स व बँकांमधील लॉकर्सही तपासले आहेत. याशिवाय मनमाड व नांदगाव येथील त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या घरीही तपासणी करण्यात आली.

# सुट्यांमुळे अक्कलकोटमध्ये पुणे, मुंबईसह देश-विदेशातून भाविकांची गर्दी

**अक्कलकोट :** बुद्धपौर्णिमा, शनिवार रविवार सुट्टी व सलग सुट्ट्यांनमुळे श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी आठ दिवसात १० लाखांहून अधिक भाविकांनी स्वामींचे दर्शन घेतले. सतत वाढत चाललेल्या गर्दीमुळे वाहतुकीची कोंडी, निवासासाठी प्रतीक्षा व नाहक त्रास, अरुंद रस्ते व अस्वच्छता यामुळे भाविकांना अनेक अडचणीच्या सामोरे जावे लागले. येणाऱ्या भाविकांना सुलभ सुविधा मिळण्यासाठी प्रशासनाने पाऊले उचलण्याची मागणी सकल स्वामी भक्तातून होत आहे.



सलग आलेल्या सुट्यांमुळे अक्कलकोटमध्ये पुणे, मुंबईसह देश-विदेशातून भाविकांची सख्या सतत वाढत आहे. भाविकांना दर्शनासाठी चार ते सहा तास लागत होते. वटवृक्ष देवस्थान, मुरलीधर मंदिर, समाधी मठ (चोळप्पा मठ), गुरु मंदिर (बाळप्पा मठ), राजेराय मठ, शिवपुरी, नवसाचा मारुती मंदिर, एकमुखी दत्त मंदिर व अन्नछत्र मंडळातील श्री शमी विघ्नेश गणेश मंदिर येथे दर्शनासाठी व महाप्रसादाकरिता श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे गर्दी झाली होती.

दरम्यान पोलीस प्रशासनाने शहरातील वाहनांची कोंडी टाळावी म्हणून कमलाराजे चौक, कारंजा चौक, मैंदर्गी रोड या ठिकाणी बॅरिकेडिंग करून वाहनांना मंदिर परिसरात सोडले नाही. त्यामुळे भाविकांनी मिळेल त्या ठिकाणी वाहने लावण्यात येत असल्याने वाहतुक कोंडीत भर पडली.

**अव्वाच्या सव्वा रक्कम आकारली जातेय**

**अक्कलकोट शहरात सर्वत्र रस्त्याच्या कडेला भाविकांची वाहनेच वाहन दिसत होती. गर्दीमुळे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे यात्रीनिवास, यात्रीभवन व श्री वटवृक्ष स्वामी महाराज देव्वास्थान समितीचे भक्तनिवास आणि शहरातील शिवपुरी लॉज फुल्ल होते. मग एका भक्तनिवासातून दुसऱ्या भक्तनिवासाकडे, तेथून खासगी हॉटेल, लॉज करिता घरगुती निवासाकडे भाविक वळत आहेत. यातूनच मग वेळ बघून भाविकांना अव्वाच्या सव्वा रक्कम आकारली जात आहे.**

**अन्नछत्र मंडळाचा ९ तास महाप्रसाद सेवेचा विक्रम**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून सकाळची अन्नदानाची वेळ पाच वाजेपर्यंत वाढविली आहे व रात्रीची अन्नदानाची वेळ बारा वाजे पर्यंत केले आहे. फक्त सायंकाळी पाच ते रात्री आठ हे तीन तास सोडता सकाळी ११ वाजल्यापासुन रात्री १२ वाजेपर्यंत अन्नदान सेवा केले जात आहे. जास्तीत जास्त भाविकांना प्रसाद मिळण्यासाठी अन्नछत्र मंडळ प्रयत्नशील आहे. अन्नछत्र मंडळाचा ९ तास महाप्रसाद सेवेचा विक्रम झाला असून, राज्यातील अन्य श्रीक्षेत्रातील महाप्रसादालयात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे भक्तांना सेवा देण्यामध्ये अव्वल ठरले आहे.

**तीर्थक्षेत्र विकासाला न्यासाकडून बहुमोल मदत**

**अन्नछत्र या न्यासाने राज्य परिवहन मंडळाच्या चालक-वाहक आणि खासगी वाहनांच्या चालकांसाठी अद्यावत विश्रांती कक्ष असून, रा.प.म. व खासगीच्या दररोज शेकडो वाहने येतात. याबरोबरच नुकतीच न्यासाने घेतलेल्या जागेवर अद्यावत इतर वाहनाकरिता वाहनतळाची देखील व्यवस्था केलेली आहे. तीर्थक्षेत्र विकासाला बहुमोल मदत देखील न्यासाकडून होत आहे. नेहमीच न्यास स्वामी भक्तांना सोयी-सुविधा देण्याकामी अग्रेसर आहे. तसेच शासनाच्या विविध उपक्रमांना हे न्यास वेळोवेळी सर्वोतोपरी सहकार्य करीत असते.**

# १ जून पासून जिल्हा परिषदेत ई ऑफिस प्रणाली सुरु

**कोल्हापूर :** सरकारी काम आणि सहा महिने थांब ही प्रचलित म्हण बदलण्यासाठी जिल्हा परिषदेत ई ऑफिस प्रणाली सुरु झाली आहे. एक जून पासुन सर्व, विभागात शंभर टक्के ई ऑफिस प्रणाली सूरू करण्यात येणार आहे. या नंतर जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती आणि ग्रामपंचायत मध्ये देखिल ई ऑफीस सुरू करण्यात येणार आहे. या प्रणाली मुळे आता एखादी फाईल ४८ तासांपेक्षा अधिक काळ थांबणार नाही याची दक्षताही या प्रणालीअंतर्गत घेतली जाणार आहे.

शासकिय कामासाठी अनेकांना त्या कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागतात. त्या ठिकाणचे संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी अनेक कारणे देऊन नागरिकांच्या फाईलचा वेळेत निपटारा करत नाहीत. त्यामुळं साहजिकच सरकारी काम आणि सहा महिने थांब' अशी एक प्रचलित म्हण आहे. मात्र ई ऑफिस प्रणालीच्या माध्यमातून ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर जिल्हा परिषदमध्ये ई ऑफिस प्रणाली सुरू करण्याबाबत त्यांनी जाहीर केलं होतं.

त्यानूसार उपलब्ध तंत्रज्ञानाच्या आधारे ही प्रणाली आता जिल्हा परिषदेत सुरू करण्यात आली आहे... १ जून २०२४ पासून 'ई ऑफिस' म्हणजेच पेपरलेस ऑफिसची संकल्पना, शंभर टक्के सर्वच विभागात राबवण्यात येणार आहे. या कागद पत्रावर संबंधीत अधिकाऱ्यांची डिजिटल सही असणार आहे. जिल्हा परिषदेअंतर्गत १ हजार २५ ग्रामपंचायती, तर बारा पंचायत समित्या आणि १९०० हून अधिक शाळा येतात. या सर्व गावांचे रस्ते, पाणीपुरवठा योजना, अंगणवाड्या, पाचशेहून अधिक असलेले दवाखाने एवढी प्रचंड यंत्रणा कार्यरत असते. कमी मनुष्यबळ, संगणकीय कामकाज फारसे तरबेज नसलेले ज्येष्ठ कर्मचारी अशा अनेक कारणांमुळे अनेक कामांच्या आणि प्रकरणांच्या फाइल्सचा प्रवास थांबलेला असतो. मात्र आता 'ई ऑफिस' संकल्पना राबवण्यास सुरवात झाली आहे. एक जून पासून सर्वच विभागांमध्ये शंभर टक्के ई ऑफिस प्रणाली सुरू करण्यात येणार आहे .. तर पुढील दोन महिन्यात सर्व पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीना या प्रणालीशी जोडलं जाणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी दिली. दरम्यान याचा फायदा आता सर्वसामान्य नागरिकांना होणार आहे.

## सांगलीत महिलेचे अपहरण करून लैंगिक अत्याचार

**सांगली :** दूरच्या नात्यातील एका महिलेचे अपहरण केल्यानंतर पती व मुलांना ठार मारण्याची धमकी देऊन जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवून त्याचे अश्लील फोटो, व्हिडीओ व्हायरल केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी महेश राजाराम शेजुळ (वय ३०) व राजाराम शेजुळ (रा. मिरज एमआयडीसी, शहा-लुल्लानगर) या दोघांविरुद्ध विश्रामबाग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# चोरीचा छडा लावल्याने शहरातून तपास कौशल्याचे कौतुक

**कुरुंदवाड :** येथील महिलेच्या घरात घुसून चाकूचा धाक दाखवत गळ्यातील १लाख ५० ह. किमतीची सोन्याची साखळी मोटार सायकल सह घेऊन फरार झालेल्या चोरट्यांना कुरुंदवाड पोलिसांनी शि ताफिने तपास करून गजाआड करण्यास यश मिळाले आहे २४ तासाच्या आत सपोनी रवींद्र फडणीस यांच्या पथकाने चोरीचा छडा लावल्याने शहरातून त्यांच्या तपास कौशल्याचे कौतुक होत आहे



याबाबत माहिती अशी की कुरुंदवाड येथील श्रीमती सुनिता राजेंद्र कापसे या महाराणा प्रताप उद्यानासमोर अपार्टमेंटमध्ये राहात आहेत शुक्रवारी दुपारी अज्ञात युवक त्यांच्या घरामध्ये येऊन तुमचा मुलगा ओळखीचा आहे असे सांगून श्रीमती सुनिता कापसे यांना चाकूचा धाक दाखवत घरातील सोनसाखळीसह एकूण एक लाख पन्नास हजार रुपये किमतीचा शुक्रवारी चोरून नेला होता हा प्रकार घडल्यानंतर कुरुंदवाड पोलिसांनी तातडीने या ठिकाणी भेट देऊन वेगवेगळी पथके तयार करून चोरट्यांच्या मार्गावर पाठवली दुसऱ्या दिवशी दुपारी म्हैशाळ नरवाड दरम्यान असणाऱ्या कॅनॉल वरती आरोपी आंघोळीस येणार असल्याची माहिती मिळाल्याने त्यांनी तातडीने त्यांना त्या ठिकाणी अटक केली यामध्ये प्रथमेश उर्फ गणेश शिवाजी गोरे धीरज संजय कोळी प्रज्वल महादेव कोळी रा टाकळीवाडी यांना अटक करून त्यांच्या ताब्यातील मोटरसायकल सोनसाखळी दोन मोबाईल असा एकूण १लाख ५० ह रुपये किमतीचा जप्त करून त्यांच्यावर दाखल केला आहे

तर त्यांना माहिती पुरवून फिर्यादीचे घर दाखवल्याप्रकरणी कुरुंदवाड येथील सुनील अशोक सिंग राजपूत सुशांत कलाप्पा जंगम दोघेही रा सन्मित्र चौक यांनाही अटक केली आहे यातील आरोपी प्रथमेश उर्फ गणेश शिवाजी मोरे हा रेकॉर्डवरील मोटरसायकलस्वार चोरटा असून त्याच्यावर महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात अनेक मोटर सायकल चोरीचे चे गुन्हे दाखल आहेत या गुन्ह्याची माहिती इचलकरंजी विभागाचे पोलीस अधिकारी समर सिंह साळवे यांनी पत्रकार परिषदेत दिली

शेजारीच निघाला गद्दार वरील आरोपी पैकी सुशांत कलाप्पा जंगम हा श्रीमती सुनिता कापसे यांच्या अपार्टमेंटमध्ये शेजारीच राहण्यात आहे त्यामुळे त्यांचे येणे जाणे होते शिक्षक असलेले फिर्यादींचे पती सुरेंद्र कापसे एक वर्षांपूर्वी रिटायर होऊन मयत झाले आहेत त्यांचे भरपूर पैसे व दागिने त्यांच्याकडे आहेत अशी माहिती सुशांत जंगम याने आरोपींना दिल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले✻


✻ लाखो रुपये व अनेक तोळे सोन्याचे दागिने वाचले फिर्यादीचे पती हे एक वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाल्याने त्यांचे जवळपास ४० ते ५० लाख रुपये इतकी रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा झाली होती ती त्यांनी उचल न करता तशीच बँकेत ठेवली होती तसेच अंदाजे २० तोळे सोने ही त्यांनी बँकेच्या लॉकर ठेवले होते त्यामुळे ते चोरट्यांच्या हाती लागले नाहीत अन्यथा मोठा ऐवज चोरट्यांच्या हाती लागला असता तो वाचला अशी चर्चा घटनास्थळी सुरू होती.

गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाल्याने वरील चोरट्यांना अटक करणे कामी जिल्हा पोलीस प्रमुख महेंद्र पंडित समरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी रवींद्र फडणीस पोलीस उपनिरीक्षक सागर पवार शकील कुलकर्णी सागर खाडे सचिन पुजारी विवेक कराडे फारुख जमादार संतोष साबळे जमीर जमादार अमर वासुदेव शिरीष कांबळे नागेश केरीपाळे या पथकाने विशेष परिश्रम घेतले होते

# जलद कालव्याला पाणी सोडले!

**राहाता :** नांदूरमधमेश्वर बंधार्यात मराठवाड्यातील वैजापूर, गंगापूर तालुक्यांसाठी काल शनिवारी सायंकाळी ७ वाजता जलद कालव्याला ४०० क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला. पिण्याच्या पाण्यासाठी दारणा समुहातुन जलद कालव्याला पाणी द्यावे, अशी मागणी आंदोलनाने लोकसभा निवडणूकीची प्रक्रिया सुरु असताना त्या भागातील शेतकर्यांनी केली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निवडणूकीनंतर पाणी सोडण्यात येईल असे सांगितले होते. त्यानुसार गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे छत्रपती संभाजीनगर येथील कार्यकारी संचालक यांनी एका खास आदेशाद्वारे पिण्याच्या पाण्यासाठी ८०० दलघफू म्हणजेच पाऊण टीएमसी हुन अधिक पाणी देण्याचे आदेश दोन दिवसांपूर्वी नाशिकच्या जलसंपदा विभागाला दिले होते.

त्यात दारणा समुहातील धरणांच्या मृतसाठ्यातून ४०० दलघफू व गोदावरी कालव्यासाठीच्या पाण्यातील ४०० दलघफू पाणी असे ८०० दलघफू पाणी देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार काल शनिवारी सायंकाळी ७ वाजता नांदूरमधमेश्वर बंधार्यातून ४०० क्युसेकने पाणी जलद कालव्यात झेपावले आहे. आज रविवारी या विसर्गात वाढ करुन सुरुवातीला ७०० क्युसेक व नंतर ८०० क्युसेकने विसर्ग वाढविला जाणार आहे. गोदावरी कालव्यांचे पाणी कमी करुन मराठवाड्याला देण्यात आल्याने राहाता, कोपरगाव



तालुक्यातील शेतकरी नाराज झाले आहेत. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य असल्याने पाणी मराठवाड्याला देण्यात आले. जलद कालव्याचा कोठा त्यांच्या यापूर्वीच्या आवर्तनातून संपला आहे.

पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली पुन्हा त्यांनी पाणी घेतले. पिण्याचे पाणी महत्वाचे असले तरी वर्षभराचे नियोजन जलदकालव्याचे व्हायला हवे! कालव्यांच्या मुखाशी की धरणांच्या मुखाशी पाण्याचे मोजमाप हा मुद्दा स्पष्ट नसल्याने वादातीत आहे. त्याचा फटका मात्र गोदावरीच्या लाभधारकांना बसत आहे. समन्यायी कायद्या अंतर्गत जायकवाडीला पाणी सोडण्यात आले. आता ही पिण्याच्या पाण्याच्या नावाखाली पाणी नेले जात आहे. गोदावरी कालव्यांच्या लाभधारकांना हक्काचे पाणी कधी मिळेल हा प्रश्न खर्या अर्थाने ऐरणीवर आला आहे.

काल दिनांक २५ मे २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता जलद कालवा ४०० क्युसेक्सने सुरु केला असून त्यात टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात येणार आहे. जलद कालवा मुखाशी ८०० दलघफू म्हणजे एकुण ९००० क्युसेक्स पाणी देण्यात यावे असे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे आदेश आहेत. त्यामुळे गोदावरी डाव्या, उजव्या कालव्यांचे सिंचन आवर्तनाची आशा मावळली आहे.

# उजनीतील प्रवासी वाहतूक ठरतेय जीवघेणी



**पुणे** : उजनी जलाशयातील प्रवासी वाहतूक वेळोवेळी जीवघेणी ठरत आहे. या बेकायदेशीर प्रवासी वाहतूकीला कोणाचा वरदहस्त आहे? कारवाई का होत नाही? याबाबत आता पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. कारण उजनी जलाशयात १६ पेक्षा जास्त ठिकाणी बेकायदेशीर प्रवासी वाहतूक होत आहे. याच बेकायदेशीर प्रवासी वाहतूक करणार्या बोटीचालकांवरती कारवाई होणार का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

उजनी जलाशयात तीन दिवसांपूर्वी प्रवासी वाहतूक करणारी बोट उलटून सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. जलाशयात प्रवासी वाहतूक करण्यासाठी विविध परवान्यांची आवश्यकता नाही. जलप्रवास करताना कोणतीही सुरक्षित साधनांचा वापर केला जात नाही. जलवाहतूक करणार्या बोटींना कोणतेही नियम व अटी नाहीत. त्यामुळे राजकीय वरदहस्त असला म्हणजे सगळं काही चालतंय, अशी परिस्थिती अनेक वर्षांपासून निर्माण झाली आहे. उजनी जलाशयाचे पुणे आणि सोलापूर हद्दीतील पाणलोट क्षेत्रात १६ पेक्षा जास्त ठिकाणी जीवघेणी बेकायदेशीर जलवाहतूक होते. या जलवाहतुकीकडे जलसंपदा व महसूल विभागातील कोणाचेही लक्ष नाही अथवा अंकुश नाही. त्यामुळे दोन दिवसांपूर्वी कळाशी- कुगाव दरम्यानच्या दुर्दैवी अपघाताला जलसंपदा विभाग व महसूल विभाग जबाबदार असल्याचे बोलले जात असून तसा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कळाशी-कुगाव प्रवासी वाहतूक करणार्या बोटींवर सुरक्षा साहित्य जॅकेट ठेवले जात नसल्याने जलप्रवास करणार्या प्रवाशांची सुरक्षितता रामभरोसे होती. या प्रवास वाहतूक करणार्या बोटींना जलसंपदा विभागाने रजिस्टर अथवा परवाना दिलेला नंबर आहेत का. या बोटीची नोंद कुठे केली आहे? किंवा या बोटीचा विमा उतरवलेला आहे का? याबाबत कोणीही चौकशी करत नाही किंवा करायला जातही नाही. तसेच या बोटी चालवणार्या लोकांकडे व बोटीकडे जलसंपदा विभाग जाणून बुजून कानाडोळा करत आहे का? त्यामुळे अशा बेकायदेशीर जलवाहतुक करणार्या बोटींची संख्या अधिक झाली असून, हा प्रकार फोफावला असल्याने अनेक निरापराध लोकांचा जीव गेला आहे.

**धक्कादायक घडेलल्या पाच दुर्घटना**

**पहिली घटना** : करमाळा तालुक्यातील टाकळी येथे उजनी जलाशयात १९९३ मध्ये टाकळी ते पळसदेव प्रवासी वाहतूक करणार्या होडीचा अपघात होऊन सुमारे २६ जणांना दुर्दैवी जलसमाधी मिळाली होती. त्या घटनेत निरापराध २६ लोकांचा अंत झाला होता. या घटनेचे तीव्र प्रसाद त्यावेळेस ही उमटले होते.

**दुसरी घटना** : २०१७ मध्ये माळशिरस तालुक्यातील अकलूज, नातेपुते या भागातील उजनीच्या जलाशयावरती सहलीसाठी आलेल्या डॉक्टरांचा इंदापूर तालुक्यातील आजोती येथे होडी उलटून चार डॉक्टरांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली.

**तिसरी घटना** : करमाळा तालुक्यातील केम येथे लग्नकार्याला आलेल्या अकलूज येथील बापलेकाचा होडी उलटून मृत्यू झाला होता, ही घटना मार्च २०२१ मध्ये घडली होती.

**चौथी घटना** : २०२२ च्या जानेवारीमध्ये चिकलठाण येथे मुंबईहून साखरपुड्यासाठी आलेले मच्छीमारांचे दोन नातेवाईक होडीतून फेरफटका मारताना त्यातील एकाने पोहण्यासाठी उडी मारली त्याला वाचवण्यासाठी एकाने दुसऱ्याने उडी मारली आणि बुडणाऱ्याने गळ्याला मिठी मारल्याने दोघेही बुडाले. त्या घटनेच्या दोघांचाही मृत्यू झाला.

**पाचवी घटना** : दोन दिवसांपूर्वी उजनी जलाशयात बोट पलटी होऊन सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. जो पर्यंत काटेकोरपणे या घडलेल्या घटनांकडे प्रशासन पाहत नाही व पाण्यातील प्रवासी नियमांचं पालन होत नाहीत तोपर्यंत अशा घटना व अपघात घडतच राहणार आहेत.

**या ठिकाणी बेकायदेशीर जलवाहतूक**

- चिकलठाण ते पडस्थळ
- वाशिंबे ते गंगावळण
- कुगाव ते शिरसोडी
- कुगाव ते कळाशी
- कुगाव ते कालठण
- शिरसोडी ते चिकलठाण
- ढोकरी ते शहा
- केतुर ते चांडगाव

# महाबळेश्वर पर्यटकांनी गजबजले

**सातारा** : दरवर्षी उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली की महाराष्ट्राचे मिनी काश्मीर अर्थात महाराष्ट्राचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या महाबळेश्वर आणि पाचगणी या पर्यटन स्थळाला पर्यटकांची भेट देण्यासाठी अक्षरशः चढाओढ लागते. दरवर्षी राज्याचे राज्यपाल ही शासकीय दौऱ्यानुसार पाच दिवस सातारा जिल्ह्यातील या थंड हवेच्या ठिकाणी महाबळेश्वरच्या राजभवन येथे येऊन या उन्हाळी पर्यटनाचा आनंद लुटतात, आता यावर्षी महाबळेश्वर, पाचगणी, लगतच्या तापोळा, बामनोली, वाई, कास या पर्यटन स्थळावर ही पर्यटकांची विशेष गर्दी होऊ लागली आहे.



वाढत्या उन्हाचा चटका पर्यटकांना बसू नये यासाठी महाबळेश्वरच्या मुख्य बाजारपेठेत पालिका आणि परिसरातील व्यापारी बंधूंनी पर्यटकांना सावलीतून ये-जा करावी यासाठी हिरव्या शेडनेटचा नजारा अर्थात अच्छादनच संपूर्ण बाजारपेठेवर घातल्याचे दिसून येत आहे. लालचुटूक स्ट्रॉबेरी, मलबेरी, गुजबेरी, छोटी छोटी करवंदे, जांभळे, आळवं, कोकम, तोरण यासारख्या रानमेवा ही सध्या या परिसरात परिसरातील ग्रामस्थ विक्रीसाठी घेऊन येत आहेत. याचप्रमाणे गुलाबी मुळे, लाल चुटूक गाजरे यांचे थेलेही या ठिकाणी पाहायला मिळत आहेत.

पर्यटन म्हटले की आनंदाला उधाणच येते, त्यामुळे या साबणे रोडवर मुख्य बाजारपेठ परिसरात मस्त धुंद वातावरणात थंड हवेत, खरेदी करत आणि तोंडात महाबळेश्वरी चणे फुटाणे टाकत आस्वाद घेत या परिसरातील पर्यटक रात्री उशिरापर्यंत फिरताना दिसून येतात. या मार्गावर असलेले पाणीपुरी, भेळपुरी आणि बर्फाचा गोळा, गरमागरम मक्याच्या कणसाचे विविध प्रकार स्ट्रॉबेरी, टॉपिंग, स्ट्रॉबेरी क्रीम विथ आईस्क्रीम अनुभवण्यासाठीही पर्यटक येथे गर्दी करताना दिसतात. महाबळेश्वराच्या स्थानिक बाजारपेठेत बनवलेले कंगवे, फणी, त्याचप्रमाणे कोल्हापुरी चपला, लाकडी काठ्या खरेदीसाठी ही गर्दी होताना दिसते.

**बाजारपेठेत खरेदीचा अनुभव**

या बाजारपेठेत अनेक नामवंत कंपन्यांच्या उलन स्वेटर, टोप्या, मफलर्स, रग, रजया, बेडशीट, उशा, तक्यांचे कव्हर्स खरेदीसाठीही पर्यटक गर्दी करतात. दुपारच्या वेळेस परिसरातील १२ स्थानिक पर्यटन स्थळ पॉइंट आणि दोन ऐतिहासिक शिवमंदिरे आणि पंचगंगा मंदिराला भेट देऊन सायंकाळचे वेळी वेण्णालेक येथील नौका विहाराचा आनंद पर्यटक घेताना दिसतात.

**घोडे सवारी, नौकार विहार**

घोडे सवारी व विविध प्रकारच्या मनोरंजक खेळाचा आनंद लुटून वेण्णा लेक परिसरात असलेल्या छत्रपती शिवाजी उद्यानात फोटोग्राफीसाठी आपला काही क्षण दवडतात. सुमारे तीन दिवसांची आनंद देणारी ट्रीप एन्जॉय करताना पर्यटक लगतच्या पाचगणी येथील टेबल लँड, पार्शी पॉईंट, गुहा हा नजारा अनुभवून तापोळा येथे शिवसागर जलाशयात नोका विहार करतात. बामनोली परिसरातील निसर्गरम्य अशा परिसराचा आनंद लुटतात आणि परतीच्या प्रवासाला सुरुवात करतात.

# ‘India’ आघाडी सत्तेत आल्यास मुस्लिमांसाठी संविधान बदलेल : पंतप्रधान मोदी

एकीकडे लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठी मतदान होत आहे, तर दुसरीकडे सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील निवडणुकीची रणधुमाळी तीव्र होत आहे. ‘ही रात्र शेवटची, ही रात्र जड आहे’ या धर्तीवर सातव्या टप्प्यातील निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त जागा जिंकण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रयत्न केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदीस्वत: सातत्याने निवडणूक सभा आणि रोड शो करत आहेत. आता संपूर्ण लढा मुस्लिम आरक्षणावरकेंद्रित झाला आहे. एनडीए असो वा इंडिया अलायन्स, सर्वांचे लक्ष्य मुस्लिम आरक्षण आहे.



बिहारमधील सासाराम लोकसभा मतदारसंघाचा प्रचार करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षांवर जोरदार निशाणा साधला. ते म्हणाले की, भारत आघाडीने मुस्लिमांना असंवैधानिक आरक्षण देण्याबाबत बोलले आहे. असे करून विरोधी पक्षांनी संविधानाच्या पाठीत खंजीर खुपसला. ते म्हणाले की, भारतीय लोक मुस्लिमांना एससी/ एसटी आरक्षण देण्याचा कट रचत आहेत. पीएम मोदी करकटमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करताना म्हणाले, जंगलराज भाग-२ मधून जे पहिल्यांदा मतदान करणार आहेत त्यांना मी सावध करू इच्छितो त्यावेळी हे करणे कठीण होते. संध्याकाळनंतर बाहेर जा, डकैती, खून, हे बिहारचे दुर्दैव बनले आहे. एनडीए सरकारने बिहारच्या जंगलराजमधून बाहेर काढले आहे ते म्हणाले, आज मी बिहारच्या जनतेला आणखी एक हमी देत आहे, ज्यांनी बिहारच्या गरिबांना लुटले आणि त्यांना नोकऱ्यांच्या बदल्यात जमीन मिळवून दिली. कान देऊन ऐका, तुरुंगात जाण्याची उलटी गिनतीही सुरू झाली आहे. ..

विरोधी आघाडी ‘इंडिया’ सत्तेवर आल्यास मुस्लिमांच्या हितासाठी संविधान बदलेल

पंतप्रधान म्हणाले की, विरोधी आघाडी ‘इंडिया’ सत्तेवर आल्यास मुस्लिमांच्या हितासाठी संविधान बदलेल. पंतप्रधान मोदींनी ‘भारत’ युतीवर जोरदार हल्ला चढवला आणि मुस्लिम व्होट बँकेसाठी ‘गुलामगिरी’ आणि ‘मुजरा’ केल्याचा आरोप केला. पाटलीपुत्र लोकसभा मतदारसंघातील रॅलीत नरेंद्र मोदींनी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला आणि अल्पसंख्याक संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांना ‘आरक्षण नाकारल्या’साठी ठगऊ आणि काँग्रेस सारख्या पक्षांना जबाबदार धरले.

ते म्हणाले, ‘बिहार ही भूमी आहे ज्याने सामाजिक न्यायाच्या लढ्याला नवी दिशा दिली आहे. डउ, डढ आणि जइउ चे हक्क लुटण्याचे आणि ते मुस्लिमांना देण्याचे ‘भारत’ युतीचे मनसुबे उधळून लावीन असे मला त्याच्या मातीत जाहीर करायचे आहे. ते गुलाम राहू शकतात आणि आपली व्होट बँक खूश करण्यासाठी ‘मुजरा’ करू शकतात.

पीएम मोदींनी असा आरोप केला की विरोधी आघाडी ‘व्होट जिहाद’मध्ये गुंतलेल्यांच्या पाठिंब्यावर अवलंबून आहे आणि कोलकाता उच्च न्यायालयाच्या आदेशाचा हवाला देत अनेक मुस्लिम गटांचा ओबीसी यादीत समावेश करण्यात आला आहे .

दुसरीकडे बिहारमधील विरोधी पक्षांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजप आणि एनडीएवर छऊ- जोरदार निशाणा साधला. भारत आघाडीच्या वतीने आरजेडीचे तेजस्वी यादव यांनी आघाडी घेतली. बिहारमधील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव म्हणाले की, पंतप्रधानांची भाषा दिवसेंदिवस खराब होत आहे. त्यांच्या समर्थकांनाही त्यांची भाषा आवडलेली नाही. मुस्लिम आरक्षणावरून पंतप्रधान मोदींवर हल्लाबोल करताना तेजस्वी यादव म्हणाले की, तुम्ही १३ वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री होता, तुम्हाला तिथे २५ मुस्लिम जातींना आरक्षण मिळत आहे हे माहीत नव्हते.

तेजस्वी म्हणाले की, आरक्षणाला विरोध हा पंतप्रधानांच्या शिरपेचातच आहे. पंतप्रधानांना राज्यघटनेचे मूलभूत ज्ञान नाही. लोकसभा निवडणुकीच्या ७ व्या टप्प्यात १ जून रोजी बिहारमधील नालंदा, पटना साहिब, पाटलीपुत्र, आराह, बक्सर, सासाराम, करकट आणि जेहानाबाद या ८ जागांवर मतदान होणार आहे. बिहारमधील या ७ जागांसाठी एकूण १३४ उमेदवार रिंगणात आहेत. अंतिम टप्प्यात ८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील एकूण ५७ जागांसाठी मतदान होणार आहे.

# वादळी पावसात वीज पडून ठार झालेल्या महाविद्यालयीन युवकाच्या वारसांना मिळणार ४ लाख रुपयांची मदत

## प्रशासकीय कार्यवाही पूर्ण : तहसीलदार डॉ. अभिजीत जाधव यांची माहिती

**फलटण** : फलटण शहर, उपनगर व तालुक्यात गुरुवारी सायंकाळी वादळी वार्यासह, विजांच्या कडाडाटात मुसळधार पाऊस झाला. या पावसात फलटण शहरासह तालुक्यात नागरिकांच्या मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले. घरांच्या भिंती पडल्या, पत्रे उडाले. अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत.



दरम्यान, या पावसातच सरडे (ता. फलटण) येथे महाविद्यालयीन शिक्षणासाठी आलेला युवक कै. ज्ञानेश्वर गहिनीनाथ ढोले (रा. जामखेड, ता.जि. अहमदनगर) हा वीज पडून मृत्युमुखी पडला. त्याच्या मृत्यूचा पंचनामा करून त्याच्या नातेवाईकांना प्रशासकीय मदत मिळवून देण्यासाठी फलटण तहसील कार्यालयामार्फत तातडीने कार्यवाही करण्यात आली. शुक्रवारी कै. ज्ञानेश्वर गहिनीनाथ ढोले यांचे आई-वडील तसेच अन्य नातेवाईक (राहणार जामखेड, तालुका-जिल्हा अहमदनगर) येथून प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्याकामी तहसील कार्यालय फलटण येथे उपस्थित होते. त्यांना मदत देण्यासाठी सर्व प्रशासकीय प्रक्रिया आज पूर्ण केली आहे. रक्कम रुपये चार लाख ही कै. ज्ञानेश्वरच्या वारसांच्या नावे पुढील आठवड्यात थेट डीबीटी‘ द्वारे त्यांच्या खात्यात जमा होणार आहे, अशी माहिती फलटणचे तहसीलदार डॉ. अभिजीत जाधव यांनी दिली आहे.

त्याचप्रमाणे या पावसाने अलगुडेवाडी (ता. फलटण) येथील खातेदार अंकुश तुकाराम जाधव यांच्या घरावरील पत्रा उडाला आहे. कापडगाव (ता. फलटण) येथील नाना तात्याबा करे यांच्या घराचे वादळी वार्यामुळे नुकसान झाले आहे. आंदरूड (ता. फलटण) येथे वादळी वारे व पावसामुळे नुकसान झालेल्या धोंडीबा साधू चव्हाण यांच्या घराचा पंचनामा केलेला आहे.

मिरेवाडी येथील यादव कोंडीबा चव्हाण यांच्या शेडची पडझड झाली आहे. रावडी खुर्द मधील गरीब मागासवर्गीय कुटुंबातील तरुण शेतकरी श्री. किशोर अशोक गायकवाड यांचे खूप नुकसान झाले आहे. या सर्व पडझडीचे, नुकसानीचे पंचनामे फलटण तहसील कार्यालयामार्फत पूर्ण झाले असून त्यांना तातडीने प्रशासकीय मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे, अशी माहितीही फलटणचे तहसीलदार डॉ. अभिजीत जाधव यांनी दिली आहे.

# पुसदच्या MIDC मध्ये मोठ्या उद्योगांचा अभाव

**पुसद** :- पुसदच्या एमआयडीसी परिसरात अजूनपर्यंत मोठे उद्योग, कारखाने आले नसल्यामुळे औद्योगिक वसाहती मधील अनेक मूखंड रिकामेच धुळखात पडलेले दिसत आहेत तर अनेक इमारती या भंगार अवस्थेत गेल्या असून अनेक इमारतींना तडे गेले आहेत. १९९३ यावर्षी पुसद या औद्योगिक वसाहतीची स्थापना झाली. याला ३० वर्षाचा कालावधी लोटला. तरीही परिसरात एमआयडीसी चे स्थानिक कार्यालय सुद्धा उपलब्ध नसल्यामुळे सर्व कारभार यवतमाळच्या कार्यालयातूनच होत असल्याचे दिसून पडत आहे.कोणत्याही गावाचा विकास व्हायला त्या त्या गावातील औद्योगिक वसाहतींचा मोठा हातभार असतो. पुसदच्या औद्योगिक वसाहतीला अनेक वर्ष झालीत तरीही या ठिधणी अजून पर्यंत कोणतेही मोठे उद्योग कारखाने रोजगार उपलब्ध करून देईल असा एखादा चांगल्या कंपनीचे युनिट आलेच नाही. सध्या स्थितीत एमआयडीसीमध्ये



केवड बोटावर मोजण्याइतके स्थानिक युनिट सुरू आहेत. त्यामध्ये अमृतधारा डेअरी प्रोडक्ट युनिट, विजय ॲग्रो जिनिंग युनिट, वसंत बायोटेक कृषी युनिट, छोटे मोठे किरकोळ कारखाने इत्यादी महावितरणला लोखंडी पोल पुरविणारी खाजगी युनिट, ट्रॅक्टरचे पार्टस निर्मिती करणारी युनिट, पेवर ब्लॉक व पुठ्याचे उद्योगांचे युनिट कारखाने या औद्योगिक परिसरातील भूखंडांवर असून अजूनही मोठ्या उद्योग कारखान्यांची प्रतीक्षा या औद्योगिक वसाहतीला आहे.

**औद्योगिक वसाहतीला मोठा फटका**

सध्या स्थितीत औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या या ४० उद्योगांमधून किमान प्रायक्ष आय १००० लोकांना रोजगार उपलब्ध होत आहे. पुसद परिसरात दळणवळणाची साधने अपूरीआहेत. या कारणांमुळे कदाचित या औद्योगिक वसाहतीच्या विकासाला चा पेच निर्माण झालेला असावा तालुक्याची लोकसंख्या चार लाखाच्या जवळ गेली आहे तर सर्वात जास्त ६० टक्के ग्रामीण जनता कामधंद्यानिमित्त कुटुंबासह स्थलांतर करणारे परिवार आहेत. या भागात रेल्वे नसल्यामुळे याचा मोठा फटका औद्योगिक वसाहती ला बसला असून पर्यायाने पुसद तालुक्याच्या विकासाला मोठा फटका बसल्याचे दिसते. वास्तविकता पुसद तालुक्याची राजकीय पार्श्वभूमी अतिशय मोठीच राज्याला दोन मुख्यमंत्री देणारा तालुका सातत्याने कंविनेट मंत्रीपद मिळणारा तालुका तर आजच्या घडीला तीन आमदार व एक खासदार असलेला तालुका तरीही गेल्या अनेक वर्षांपासून तालुका हा विकासापासून कोसो दूर असल्याचे दिसून येत आहे. ज्या पद्धतीने पश्चिम महाराष्ट्र असते कोकण असो खानदेश असो वा मुंबई या भागांचा विकास मोठ्या झपाट्याने झाला. त्या ठिकाणच्या राजकीय नेत्यांनी करून घेतला मात्र पुसद तालुक्यातील राजकीय नेत्यांची अनास्था येथील विकासाला नडल्याचे दिसत आहे.

सहकार क्षेत्रातून उभारलेल्या सहकारी कारखाने जिनिंग प्रेसिंग मधून सोन्याचा धूर निघत असे.

तालुक्यातील एकेकाळी सहकार क्षेत्रातून उभारलेल्या सहकारी कारखाने जिनिंग प्रेसिंग मधून सोन्याचा धूर निघत असे. कालांतराने मात्र सर्व सहकारी उद्योगचंदे व काररखाने जिनिंग प्रेसिंग स्थानिक नेत्यांच्या व लोकप्रतिनिधींच्या अकार्यक्षमतेमुळे, पुसदच्या औद्योगिक वसाहतीचा बट्ट्याबोळ झालेला दिसत आहे. औद्योगिक वसाहतीचा सर्वांगीण विकास सर्व स्थानिक नेत्यांनी तो झाल्याशिवाय राहणार नाही. आज पुसद तालुक्याची वाटचाल जिल्ह्याच्या दिशेने सुरू आहे. सत्ताधारी पक्षांमध्ये महायुतीच्या सरकारमध्ये पुसद विधानसभेचे(डशसळीश्ररींळींश -ीशालश्र) आमदार इंद्रनील नाईक व भारतीय जनता पक्षाचे विधान परिषद आमदार एड. निलय नाईक तर तर खासदार म्हणून येथे चार जून रोजी कोण प्रतिनिधित्व करेल हे निश्चित होणार आहे. या सर्वांनी मिळून पुसद औद्योगिक वसाहतीचा विकास करणे गरजेचे आहे. पुसदचे लोकनेते माजी मंत्री मनोहर नाईक यांनी आता तरी गांभीर्याने पुसदच्या विकासाचा ध्यास शेवटच्या टप्प्यात घेणे गरजेचे आहे. ज्याने कालांतराने अनंत काळापर्यंत त्यांचं नाव अजरामर होईल. अशी भावना पुसद तालुक्यातील बेरोजगारांची आहे.